MHGA040001372024

दाखल तारीख : ०७.०५.२०२४
नोंदणी तारीख : ०७.०५.२०२४
निकाल तारीख : ०४.०५.२०२६
कालावधी : ०१वर्ष, ११म.,२७दि.

**नि.क्र.९** वर

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आरमोरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालय<br>(पिठासीन अधिकारी श्रीमती वैशाली व्ही. चौधरी)<br>(न्यायनिर्णयाची तारीख :०४/०५/२०२६)<br>सं.फौ.मा.क्र.६३/२०२४** |
| | गुन्हा क्र. :४२०/२०२३<br>पोलीस स्टेशन : आरमोरी |
| **तक्रारदार** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस स्टेशन, आरमोरी |
| **अधिवक्ता** | सहा. सरकारी वकील श्री. उईके |
| **आरोपी** | मनोज शालीकराम लाडे,<br>वय ३५ वर्षे, व्यवसाय शेती,<br>राह. देलोडा (बु.), ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **अधिवक्ता** | आरोपीचे विधिज्ञ श्री ढोंगे |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | १७.१२.२०२३ |
| प्रथम खबरेची तारीख | १७.१२.२०२३ |
| आरोपपत्राची तारीख | ०७.०५.२०२४ |
| अपराधाचा तपशिल तयार करण्याची तारीख | ०७.०५.२०२४ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | २०.०८.२०२५ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | काही नाही. |
| निकालाची तारीख | ०४.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | काही नाही. |

## आरोपीचा तपशिल

| क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटण्याची तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४२८ फौ.प्र.सं.च्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनोज शालीकराम लाडे | कलम ४१(अ)(१) फौ.प्र.सं. सुचनापत्र दिले. | ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा | निर्दोष | नाही | काही नाही |

## फिर्यादी पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातील साक्षीदारांची यादी

**अ.** **अभियोग पक्ष** :-

| सा. क्र. | नाव | नि.क्र. | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १. | पुरुषोत्तम गजानन होकम | ९ वर | पंच |

**ब.** **आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर** :-

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**क.** **न्यायालयाकडुन साक्षीदार, जर असेल तर** :-

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील दस्तऐवजांची यादी

**अ.** **फिर्यादी** :-

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ब.** **बचाव** :-

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क.** **न्यायालय** :-

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.२ | सि.ए. अहवाल |

**ड.** **भौतीक वस्तु** :-

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

# <u>न्या य नि र्ण य</u>
## (दिनांक ०४ मे, २०२६ रोजी घोषित)

आरोपी हा मौजा देलोडा (बु.), ता. आरमोरी येथे त्याचे राहत्या घराचे बाथरुम मध्ये २० लिटर क्षमतेच्या पांढऱ्या रंगाच्या प्लास्टीक कॅन मध्ये २० लिटर हातभट्टी मोहादारु अवैध्यरित्या विनापास परवाना विक्रीकामी मिळुन आल्याने आरोपीवर कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद करुन खटला चालविण्यात आला. त्यानंतर अभियोग पक्षाने पंच साक्षीदार तपासला. खालील मुद्दे माझे समोर उपस्थीत झाले. त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणानुसार त्यांचे समोर नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिद्ध केले आहे कायं की, दि.१७.१२.२०२३ रोजी १७.०० ते १७.३० वाजताचे दरम्यान मौजा देलोडा (बु.), ता. आरमोरी येथे आरोपीच्या राहत्या घराचे बाथरुम मध्ये २० लिटर क्षमतेच्या पांढऱ्या रंगाच्या प्लास्टीक कॅन मध्ये २० लिटर हातभट्टी मोहादारु अवैद्यरित्या विनापास परवाना विक्रीकामी मिळुन आली, त्याद्वारे आरोपीने कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीस दोषमुक्त करण्यात येते. |

## <u>कारणे-मिमांसा</u>
### <u>मुद्दा क्र.१ व २</u> :-

२. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविली. अभियोग पक्षाने पंच पुरुषोत्तम होकम (सा.क्र.१) याला तपासले आहे. त्याने त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, १७.१२.२०२३ रोजी पोलीसांनी त्याला पंचनामा करण्यासाठी कुठेही बोलाविले नव्हते व त्याचे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास मदत केलेली नाही. त्यामुळे प्रकरणातील पंचनामे हे सिद्ध झालेले नाहीत. सदर न्यायालयाने त्याचा उलटतपास घेतला असता त्यात सुद्धा नकाराशिवाय काहीही आले नाही.

३. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास मदत केलेली नाही. तसेच अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवून देखिल इतर साक्षीदारांना हजर करु शकलेले नाही. फिर्यादी व तपासी अंमलदार यांना वारंवार समन्स काढून देखिल ते साक्ष देण्याकरीता न्यायालया समक्ष हजर झाले नाहीत. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केलेला आहे परंतु नमुना वाहकाला न तपासल्याने आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेले द्रव्य ही दारुच होती ही बाब सप्रमाण सिध्द होऊ शकलेली नाही. करीता जप्त दारुशी आरोपीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध होता असे कुठेही दिसून येत नाही. त्यामुळे सदर दारु आरोपीच्या ताब्यातुन जप्त केली व सदर दारुवर आरोपीचा ताबा होता हे सिद्ध झालेले नाही. त्यामुळे आरोपीने गुन्हा केला हे सिद्ध होत नाही. म्हणुन मुद्दा क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे व मुद्दा क्र.२ चे अनुषंगाने पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी नामे **मनोज शालीकराम लाडे** याची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त २० लिटर हातभट्टी मोहादारु घटनास्थळी नाश केल्याने त्याबाबत कोणताही आदेश पारित नाही.

३. आरोपीचा जात मुचलके व बंधपत्र रद्द करण्यात आले आहे.

४. आरोपीने रु.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दाखल करावे. सदर बंधपत्र पुढील ०६ महिन्यांसाठी अस्तीत्वात राहिल.

(आदेश खुल्या न्यायालयात तोंडी सांगण्यात आला व उद्घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VAISHALI VIKAS CHOUDHARI
Date: 2026.05.04 17:32:24 +0530

दि.०४.०५.२०२६

(श्रीमती व्ही.व्ही. चौधरी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
आरमोरी.